तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१
E-mail : desk19@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in

महत्वाचे

क्रमांक: १९/ मॅगनेटिक महाराष्ट्र/२०१८
दिनांक:- 1/2/2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती.

विषय:- मॅगनेटिक महाराष्ट्र — कॉनव्हर्जन्स २०१८ (Magnetic Maharashtra: Convergence २०१८)मधील सहभागाबाबत.

संदर्भ:- १. सह मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे पत्र.
२. या संचालनालयाचे दिनांक ३० जानेवारी २०१८ चे पत्र.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सदर्भांकित पत्रांचे अवलोकन व्हावे.

राज्य शासनाच्या वतीने दिनांक १८ ते २० फेब्रुवारी २०१८ या कालावधीत जागतीक गुंतवणुकदांरासाठी मॅगनेटिक महाराष्ट्र — कॉनव्हर्जन्स २०१८ ही परिषद आयोजित केली आहे. सदर परिषदे दरम्यान विविध औद्योगिक आस्थापना आणि शासकीय यंत्रणा यांचा सहभाग असेल. त्याचप्रामणे जागतिक स्तरावरील आणि औद्योगिक क्षेत्रातील नामवंत मंडळी, शिक्षण क्षेत्रातील तज्ञ व केंद्र आणि राज्य शासनाच्या अधिकाऱ्या समवेत संवाद साधण्याची संधी उपलब्ध होईल .

राज्यातील विविध शैक्षणिक संस्थामधील नवोन्मेषशाली विद्यार्थी विशेषत: उदयमशील विद्यार्थी यांना औद्योगिक क्षेत्रातील संभाव्य संधीची माहिती घेण्यासाठी सदर परिषद आणि त्या दरम्यान आयोजित चर्चा सत्रे विशेष करुन उपयोगी ठरतील. या अनुषंगाने या संचालनालयाने राज्यातील सर्व संस्थांनी त्यांच्या विद्यार्थ्यांना सदर परिषदेत उपस्थित राहण्याकरिता प्रोत्साहीत करावे, असे पत्राव्दारे कळविले आहे. सुलभ संदर्भासाठी पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

आपण देखील आपल्या अधिनस्त सर्व शैक्षणिक संस्था (अभियांत्रिकी , औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट, तंत्रनिकेतने इ.) याबाबत कळवून जास्तीत जास्त विद्यार्थी सदर परिषदेत व त्या दरम्यानच्या प्रदर्शनात सहभागी होतील असे पहावे. व याहष्टीने आवश्यक ते सर्व प्रयत्न करावे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

924
3 FEB 2018